पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ९

**सभावृत्तांत**

दिनांक - **०७/०९/२०१८** वेळ - सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **०७/०९/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई - **सभापती**
२. मा.पवार मनिषा प्रमोद
३. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
४. मा.सागर बाळासाहेब गवळी
५. मा.संगिता(नानी)प्रभाकर ताम्हाणे
६. मा.कदम निकिता अर्जुन
७. मा.अड.सचिन सुरेश भोसले

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.आगळे – प्रशासन अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.मनिषा पवार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका विधी समितीची दिनांक ०७/०९/२०१८ रोजीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १४/०९/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करणेत यावी

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

सभापती - शुक्रवार दि.१४/०९/२०१८ रोजी सकाळी ११.३० वा. पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ९

**सभावृत्तांत**

**(** दिनांक ०७/०९/२०१८ ची तहकूब सभा **)**

दिनांक - **१४/०९/२०१८** वेळ - सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक **०७/०९/२०१८** ची तहकूब सभा **शुक्रवार** दिनांक **१४/०९/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई - **सभापती**
२. मा.पवार मनिषा प्रमोद
३. मा.उषा ऊर्फ माई मनोहर ढोरे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.सागर बाळासाहेब गवळी
६. मा.पवळे सुमनताई मधुकर
७. मा.संगिता(नानी)प्रभाकर ताम्हाणे
८. मा.कदम निकिता अर्जुन

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.आगळे – प्रशासन अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक १८/०८/२०१८ व २४/०८/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ८) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**----------**

ठराव क्रमांक - ३५ विषय क्रमांक - ०१
दिनांक - १४/०९/२०१८ विभाग – प्रशासन
सुचक : मा.सागर गवळी अनुमोदक : मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/३३४/२०१८, दि.३१/०३/२०१८
विषय – "ॲनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)" अभिनामाचे पद सरळसेवा प्रवेशाने भरणेकामी कर्मचारी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्ती देणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६ विषय क्रमांक - ०२

दिनांक - १४/०९/२०१८ विभाग – प्रशासन

सुचक : मा.उषा ढोरे अनुमोदक : मा.मनिषा पवार

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/३३५/२०१८, दि.३१/०३/२०१८

विषय – "स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ" अभिनामाचे पद सरळसेवा प्रवेशाने भरणेकामी कर्मचारी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्ती देणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सवानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३७ विषय क्रमांक - ०३

दिनांक - १४/०९/२०१८ विभाग – म.भांडार विभाग

सुचक : मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक : मा.सागर गवळी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१२/कावि/१७२/२०१८, दिनांक - २७/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील जुने/निरुपयोगी भंगार साहित्य नेहरुनगर येथील गोडावुन व अन्य ठिकाणी जमा करुन ठेवण्यात आलेले आहे. सदरचे साहित्य निरुपयोगी झाले असुन फेरवापरास अयोग्य असल्याचे संबधित विभागप्रमुख यांनी प्रमाणीत केलेले आहे. प्रस्तुत साहित्याची शासकिय मुल्यांकनदार मे.ए.व्ही.शेवडे अन्ड असोशिएट पुणे यांचेकडुन प्रत्यक्ष पहाणी करुन (मुल्यांकन) अंदाजे विक्रीमुल्य काढणेत आलेले आहे. त्यानुसार मनपाचे विविध विभागाकडील भंगार साहित्याचे एकुण अंदाजे विक्रीमुल्य र.रु **1,35,89,860/-** (अक्षरी र.रु.एक कोटी पस्तीस लाख एकोन्नवद हजार आठशें साठ फक्त) कळविले आहे. प्रस्तुत किंमत चालू बाजारभाव गृहीत धरुन अंदाजे काढण्यात आलेली आहे. उक्त भंगार साहित्याची किंमत अंदाजे असल्याने प्रत्यक्ष खुल्या लिलावात कमी/जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रस्तुत साहित्याची विक्री/विल्हेवाट खुल्या लिलावाने करणे प्रस्तावीत आहे. सदर लिलावासाठी महानगरपालिका अति.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली मुख्य लेखापरिक्षक मुख्य लेखापाल, भांडार अधिकारी व संबधित विभागाचे शाखाप्रमुख यांची लिलाव समिती गठीत करण्यात येत आहे. सदर भंगार साहित्याची अंदाजे किंमत र.रु.**1,35,89,860/-** (अक्षरी र.रु.एक कोटी पस्तीस लाख एकोन्नवद हजार आठशें साठ फक्त) इतकी आहे. उपरोक्त नमुद केलेनुसार महाराष्ट्र महानगपालिका अधिनियम मधील कलम ७९ (क) नुसार महापालिकेची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता विक्री करणेस महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. त्यानुसार उक्त भंगार साहीत्याची विक्री लिलाव समितीचे निर्णयानुसार लिलावाव्दारे करणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी "उक्त भंगार साहित्याची विक्री लिलावाने करणे ऐवजी विभागाकडील चालू बाजार भावानुसार काढलेल्या भंगार साहित्याचे एकुण अंदाजित मुल्यापेक्षा अधिक रक्कम देणा-या ठेकेदारास थेट पध्दतीने उक्त भंगार साहित्याची विक्री करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सवानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३८ विषय क्रमांक - ०४

दिनांक - १४/०९/२०१८ विभाग – ब विद्युत

सुचक : मा.उषा ढोरे अनुमोदक : मा.संगिता ताम्हाणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.बक्षेका/वि/जा/१२६/२०१८, दिनांक - ०४/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगर पालिका क्षेत्रासाठी नव्याने पोलीस आयुक्तालय होणार असुन त्यासाठी प्रेमलोक पार्क चिंचवड येथील महात्मा ज्योतीबा फुले इंग्लीस स्कुल च्या इमारतीची निवड करणेत आलेली आहे. सदर कामाची तातडी लक्षात घेता सदरचे काम जुन्या तालेरा हॉस्पिटलची इमारत पाडून नविन इमारत बांधणे. या कामातुन करता येणे शक्य आहे. सदर कामाचे आदेश मे.एस.एस.साठे यांना क्र.स्था/नि/2-ब/329/2018 दिनांक 1/03/2018 अन्वये निर्गत करणेत आलेले आहेत. सदर कामांतर्गत विद्युत विषय कामाची नि.र.रू.15,21,35,406/- एवढी असुन तांत्रिक मान्यता र.रू.16,27,84,885/- एवढी आहे. तसेच पोलिस आयुक्त कार्यालयाचे इमारतीसाठी अंदाजे र.रू.43,00,000/- (अंदाजे र.रू.त्रेचाळीस लाख फक्त) खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च एकुण कामाच्या 2.82% एवढा होणे अपेक्षित आहे. सदरचे कामाचे साईटमध्ये बदल होणार असलेने काम करुन घेण्यास मा.विधी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच सदरचे काम मे.एस.एस.साठे यांनी करण्यास तयार असले बाबतचे संमती पत्र दिलेले आहे. तरी प्रेमलोक पार्क चिंचवड येथे नव्याने होणा-या पोलिस आयुक्तालयाच्या इमारतीचे विद्युत विषयक कामे “जुन्या तालेरा हॉस्पिटलची इमारत पाडून नविन इमारत बांधणे” या कामातुन करून घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सवानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६००/२०१८
दिनांक : १४/०९/२०१८

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.